**अभियोग पक्षाचा साक्षीदार क्रमांक–१ श्री. तेजस दिपक कुलकर्णी यांचा पुढील उलटतपास शपथेवर सुरु आरोपी क्र.१ करीता विद्वान श्री. बर्जे पी.एस विधीज्ञ यांचे द्वारा –**

**४५.** हे म्हणणे खरे आहे की, मला कोणताही कागद सत्यप्रत करुन देण्याचा अधिकार नसतांना पोलीसांना तपसाात छायांकित प्रती शिक्के मारुन कागद पोलीसांना दिलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.५६ पासुन ते ९१ पर्यंत हे कागदपत्रे छायांकित प्रती असुन त्यावर मी फक्त शिक्के मारुन पोलीसांना दिलेले कागद आहेत. सदर निशाणी क्र.५६ ते ९१ पर्यंत च्या कागदपत्रांवर मला शिक्के मारुन देण्यासाठी तपासी अंमलदार श्री. अशोक अवचार यांनी सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, या सर्व निशाणी क्र.५६ ते ९१ च्या मुळ कागदपत्रे पोलीसांनी माझ्याकडे आजतागायत मागणी केली नाही अथवा माझ्याकडुन जप्त केले नाही. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र.५६ ते ९१ पर्यंतची मुळ कागदपत्रे सरतपास सुरु झाला त्यावेळी सुध्दा मी न्यायालयात आणली नाहीत.

**४६.** हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०४.०९.२०२३ रोजी श्री. संजय सबनीस यांच्या कथीत आदेशानुसार अतिरिक्त विभागीय उपसंचालक युवा व क्रिडा विभाग याचा कार्यभार स्वीकारला व ते रुजु झाले या विषयीचा कोणताही कागद मी या खटल्याकामी हजर केलेला नाही अथवा पोलीसांना दिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, हे फक्त माझे म्हणणे आहे. हे मला माहिती नाही की, विभागीय क्रिडा संकुल समिती अथवा विभागीय उपसंचालक युवा व क्रिडा विभाग यांच्या मार्फत फिर्याद दाखल करायची असल्यास ते थेट फिर्याद प्रत्यक्षरित्या देवु शकत नाही व त्यासाठी कार्यालयाची वेगळी प्रक्रिया पार पाडावी लागते. हे म्हणणे खरे आहे की, कोणतीही कार्यालयाची कायदेशीर प्रक्रिया पार न पाडता मला फिर्याद देण्यास सांगितले म्हणुन मी फिर्याद दिली. हे मला माहिती नाही की, एखादी तक्रार दयायची असल्यास, कार्यालयाचा वरिष्ठ लिपिक हे फिर्याद/प्रस्ताव तयार करतो व तो विभागीय क्रिडा संकुल समिती अथवा विभागीय उपसंचालक युवा व क्रिडा विभाग यांच्याकडे पाठवतो. हे मला माहिती नाही की, हा प्रस्ताव किंवा फिर्याद यावर विभागीय उपसंचालक युवा व क्रिडा अथवा विभागीय क्रिडा संकुल समितीचे सचिव हे त्यावर कार्यालयात तो प्रस्ताव अथवा फिर्याद मिळाली असे नमुद करुन पुढे त्यांचा शेरा मारुन त्याच्यावर पुढील कार्यवाही करण्याकरिता निवासी उपजिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविला जातो. हे मला माहिती नाही की, सदर फिर्याद/प्रस्ताव हा निवासी

उपजिल्हाधिकारी यांना मिळाल्यावर ते त्यांचा अभिप्राय त्यावर लिहुन ते पुढील कार्यवाही करिता हि फिर्याद/प्रस्ताव  जिल्हाधिकारी/जिल्हादंडाधिकारी यांच्याकडे पाठवतात. हे मला माहिती नाही की, झालेली सर्व प्रक्रिया जिल्हादंडाधिकारी हे पाहतात व त्यानुसार ते पुढील आदेश फिर्याद दाखल करायची कि नाही करुन त्या विभागाकडे आदेश करुन पाठवतात. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.५६ व ७० अधिकार पत्रावर नमुद प्रमाणे कोणत्याही अधिका–याचे शेरे अथवा अभिप्राय, आदेश नमुद नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, वर नमुद प्रक्रिया/पध्दती आमच्या कार्यालयाने सदर फिर्यादबाबत पाळलेली दिसत नाही. हे म्हणणे खरे नाही की, कोणतीही प्रक्रिया पुर्ण न करता घाईघाईने श्री. संजय सबनीस यांनी मला फिर्याद दाखल करण्यास सांगितले आहे. वर नमुद कोणतीही प्रक्रिया कार्यालयाने पाळलेली नाही.

४७. या प्रकरणात जो कथीत घोटयाळ्याचा कालावधी फिर्याद देणेपर्यंत या दरम्यान विभागीय क्रिडा संकुल समिती याचे मुख्य नियंत्रक श्री. संजय शिरसाठ, पालकमंत्री व विभागीय उपसंचालक युवा व क्रिडा विभाग या विभागाचे मुख्य नियंत्रक श्री. संजय सबनीस हे होते. सदर कार्यकाळात या विभागाचे आयुक्त क्रिडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य कार्यालय, पुणे श्री. सुरज मांढरे हे होते. सदर कार्यकाळात औरंगाबाद येथील जिल्हादंडाधिकारी/जिल्हाधिकारी श्री. दिलीप स्वामी हे होते व निवासी उपजिल्हाधिकारी श्री. खिरोळकर हे होते. सदर कार्यकाळात विभागीय क्रिडा संकुल समिती व विभागीय उपसंचालक युवा व क्रिडा विभाग औरंगाबाद यांचे आर्थीक व्यवहार करण्यासाठी सही करण्याचे अधिकार श्री. संजय सबनीस यांना होते. सदर काळात पालकमंत्री अथवा अध्यक्ष विभागीय क्रिडा संकुल समिती हे पद रिकामे होते हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, हे मला माहिती नसतांना सुध्दा मी खोटी माहिती दिली आहे. श्री. संजय सबनीस यांचे पुढील नियंत्रक अधिकारी हे तत्कालीन काळात जिल्हाधिकारी श्री. दिलीप स्वामी हे होते. माझे असे म्हणणे नाही की, श्री. संजय सबनीस यांना विभागीय क्रिडा संकुल समितीचे अध्यक्ष तथा पालकमंत्री यांना माहिती देणे अथवा परवानगी घेणे अथवा अहवाल सादर करण्याची आवश्यकता नव्हती. श्री. संजय सबनीस यांना प्रथम रिपोर्ट हा जिल्हाधिकारी श्री. दिलीप स्वामी यांना करावा लागत असे, त्यानंतर पालकमंत्री तथा अध्यक्ष विभागीय क्रिडा संकुल समिती यांना करावा लागतो, साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, या दरम्यान विभागीय आयुक्त हे रिपोर्टींग ऑथोरिटी आहे. हे म्हणणे खरे आहे की, अगोदर मी प्रक्रिया काय असे सांगितले होते, पण आता विभागीय आयुक्त यांना रिपोटींग ऑथोरीटी म्हटले असे मी मनाने सांगितले आहे. हे म्हणणे खरे आहे की, हि जी काही प्रक्रिया आहे याबाबत

पोलीसांनी मला आजअखेर विचारले नाही व मी ही त्यांना सांगितले नाही. हे म्हणणे खरे आहे की, कागद पाहता श्री. संजय सबनीस यांनी वरील कोणतीही प्रक्रिया पार पाडलेली नाही.

४८. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.१ हा तत्कालीन कार्यकाळात संगणक परिचालक होता हे दाखवण्यासाठी त्याचे कोणतेही ओळखपत्र या प्रकरणात हजर केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.१ याचे कोणतीही नियुक्त पत्र कुठेही दाखल नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरच्या कार्यकाळात आरोपी क्र.१ हा कधीही संगणक लिपीक नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ हा कधीही संगणक लिपीक होता असा कोणताही कागद खटल्याकामी हजर केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ हा संगणक परिचालक/लिपिक होता हे मी धादांत खोटे सांगत आहे.

४९. हे म्हणणे खरे आहे की, विभागीय क्रिडा संकुल समिती औरंगाबाद यांचा अधिकृत ई–मेल आयडी dydsportsabad@gmail.com हा होता हे दर्शवणारा कोणताही अधिकृत कागद न्यायालयात दाखल नाही. हे म्हणणे खरे आहे की, जो काही अधिकृत ई–मेल आयडी असतो तो लेटरहेडवर नमुद केलेला असतो. नि.क्र.५६ व ७० आदेश मला दाखवला. नि.क्र.५६ व ७० वरील आदेशांवर ई–मेल आयडी म्हणुन dyds.abad@gmail.com हा नमुद आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझा फिर्याद जबाब नि.क्र.६६ व नि.क्र.५५ माझा सरतपास यामध्ये नमुद ई–मेल आयडी dydsportsabad@gmail.com असल्याचा कागदोपत्री आधार नाही. हे म्हणणे खरे आहे की, असा कोणताही आधार असल्याचा कागद हजर केलेला नाही की, हा ई–मेल आयडी dydsportsabad@gmail.com कार्यालयाचा असल्याचा हजर केलेला नाही. मी dsccch.sambhajinagar@gmail.com हा ई–मेल अधिकृत असल्याचा आधार मी हजर केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, ज्या कार्यालयाचे अधिकृत ई–मेल बाबत काहीही माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, या ई–मेल आयडी बाबत मी जी काही कथने केलेली आहेत ती धादांत खोटी कथने केलेली आहे.

५०. हे म्हणणे खरे आहे की, विभागीय क्रिडा संकुल समिती औरंगाबाद (यापुढे संबोधन वि.क्रि.सं.स. असे करण्यात येत आहे) व विभागीय उपसंचालक क्रिडा व युवक सेवा, औरंगाबाद (यापुढे संबोधन वि.उप.क्रि.यु.से. असे करण्यात येत आहे.) यांचे दोन्ही कार्यालयाचे वेगवेगळे आवक व जावक रजिस्टर ठेवलेली असतात. हे म्हणणे खरे आहे की, या दोन्ही विभागाचे आवक व जावक सांभाळण्यासाठी वेगवेगळे कर्मचारी ठेवलेले असुन ते आवक व

जावकच्या नोंदी ठेवतात. हे म्हणणे खरे आहे की, जो काही पत्रव्यवहार येतो अथवा जो काही पत्रव्यवहार केला जातो तो आवक व जावक मध्ये नमुद करुन त्या पत्रांवर आवक व जावकच्या नोंदी घालुन स्विकारला अथवा पाठविल्याच्या नोंदी ठेवुन त्या–त्या विभागात पत्रव्यवहार पाठवला जातो. हे म्हणणे खरे आहे की, आवक जावकच्या ज्या काही नोंदी आहे त्या केल्याशिवाय कोणताही कागद समिती बाहेर पाठवला जात नाही अथवा कार्यालयातील तत्सम अधिकारी यांच्याकडे पाठवला जात नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.७४ पत्र दिनांक २२.०४.२०२४ चे तपासी अंमलदार यांनी दिले ते माझ्या नावचे नाही. हे म्हणणे खरे आहे की, या पत्रावर कोणताही आवक शेरा व नंबर नाही. हे म्हणणे खरे आहे की, या पत्रावर मिळाल्याची माझी सही आहे. हे म्हणणे खरे नाही की, याचा अर्थ असा होतो की, श्री. संजय सबनीस यांनी मला पत्र घेण्यास सांगितले म्हणुन मी पत्र घेतले. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.७४ पत्र स्वीकाराण्याचा मला अधिकार नाही व माझा संबंध नाही. मला नि.क्र.७४ स्वीकारण्याबाबत कार्यालयाने कोणताही लेखी आदेश दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.५६ व ७० हे आदेश श्री. संजय सबनीस व मी संगनमत करुन बोगस व बनावट तयार करुन हजर केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, श्री. संजय सबनीस व मी संगनमत करुन व या बोगस बनावट आदेशाव्दारे आरोपी क्र.१ विरुध्द खोटी फिर्याद दाखल केलेली आहे.

**५१**. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.६१ दिनांक ०७.०३.२०१९ चे पत्र, नि.क्र.६१–अ–ब–क हे सही नमुने, आधार कार्ड व पॅन कार्ड, नि.क्र.६२ इंडीयन बँक याना दिलेले दिनांक २६.०९.२०२३ चे पत्र व नि.क्र.६३ जानेवारी २०२४ मधील एकुण कार्यरत कंत्राटी कर्मचारी हे कागद मी तयार केलेले नाहीत, अथवा यावर माझी सही नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.५६ पासुन ९१ पर्यंतचे सर्व कागदपत्रांच्या सत्यतेबाबत मी काही भाष्य करु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला आजअखेर कोणत्याही छायांकित अथवा स्कॅन केलेल्या प्रतींवर सत्यप्रत करण्याचा अधिकार दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, श्री. संजय सबनीस व मी हि सर्व कागदपत्रे मुळ असल्याचा भास निर्माण केलेला आहे.

**(कागदपत्रे शाबीत कसे होतात व ते मुळ स्वरुपात हजर पाहिजे का प्रमाणित प्रतीत पाहिजे याविषयीची कायदेशिर प्रक्रिया साक्षीदाराला विचारली असता, साक्षीदाराने त्यांना माहिती नाही असे सांगितले. परंतु खटल्यामध्ये जे काही कागदपत्रे हजर केलेली आहेत त्यामध्ये निशाणी क्रमांक ज्या कागदपत्रांना देण्यात आलेले आहेत, ते सर्व कागदपत्रे नि.क्र.५६ ते ९१ कागदपत्रे ओळखणे यासाठी असुन शाबीत अथवा नाही हे अंतीम युक्तीवादाच्या नंतरच ठरवता येतील.)**

**५२**. आरोपी क्र.१ याची नियुक्ती संगणक ऑपरेटर म्हणुन केलेल्या कंपनीचे पुर्ण नाव दिशा फॅसीलीटीज प्रा.लि. असे आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर कंपनीचे नाव दिशा

फॅसीलीटीज प्रा.लि. असे नसुन हे मी धादांत खोटे सांगत आहे. आरोपी क्र.१ हा सदर कंपनीने संगणक ऑपरेटर म्हणुन नियुक्त केला याबाबतचा कोणताही कागद दाखल केलेला नाही. दिशा फॅसीलीटीज प्रा.लि. हि कंपनी नोंदणीकृत झाल्याबाबतचा कागद मी पाहिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर कंपनीचे संचालक किती व कोण आहेत व कंपनीचा नोंदणीकृत पत्ता याची मला माहिती नाही. हे मला माहिती नाही की, या कंपनीचे खरे नाही दिशा फॅसीलीटी मॅनेजमेंट प्रा.लि. असे आहे. वैभव मारुती डोंबाले हे नाव कधीही ऐकलेले नाही व अथवा अशा नावाच्या व्यक्तीला मी कधीही भेटलेलो नाही व हि व्यक्ती कोण आहे हे मला माहिती नाही. हे मला माहिती नाही की, वैभव मारुती डोंबाले हे दिशा फॅसीलीटी मॅनेजमेंट प्रा.लि. या कंपनीचे एक संचालक आहे. हे म्हणणे खरे आहे की, कथीत आरोपी क्र.१ ची ज्यावेळी नियुक्ती झाली त्यावेळी मी तेथे हजर नव्हतो व त्याबाबतचा मला कोणतीही माहिती नाही.

**५३.** वेव्ह मल्टीसर्वीसेसचे मालक संदीप फोके हे आहेत. या कंपनीचे कागदोपत्री नोंदणीकृत नाव मला वेव्ह मल्टीसर्वीसेस प्रा.लि. एवढेच माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, या वेव्ह मल्टीसर्वीसेसचे एकुण किती संचालक आहेत व याचे नोंदणीकृत कार्यालय कोठे आहे हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, वेव्ह मल्टीसर्वीसेस यांनी आरोपी क्र.१ यांची संगणक ऑपरेटर व लिपीक म्हणुन नियुक्ती केली याबाबतचा कोणताही मुळ कागद मी या खटल्याकामी हजर केलेला नाही व पोलीसांना दिलेला नाही. आरोपी क्र.१ ला कार्यालयात काय कामकाज नेमुन दिले याबाबतचा त्याचा कार्यालयीन कार्यभार याचा आदेश अथवा ड्युटी लिस्ट याबाबतचा कोणताही कागद मी हजर केलेला नाही. मी पोलीसांना दिलेली जानेवारी २०२४ मधील कार्यरत कंत्राटी कर्मचारी यांची फेरीस्त नि.क्र.६३ वाचलेली आहे. हे मला आठवत नाही की, नि.क्र.६३ मधील अ.क्र.३ वरील हर्षकुमार हा संगणक परिचालक म्हणुन नियुक्त असल्याचे नमुद आहे नाकी संगणक लिपिक नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की, श्री. संजय सबनीस यांनी हर्षकुमार आरोपी क्र.१ हा संगणक परिचालक / लिपिक असल्याचे सांगितले त्याप्रमाणे मी कागदपत्रे न पाहता पोलीसांना सांगितले.

**(मध्यांन्हाची वेळ झाल्याने उर्वरीत उलटतपास तहकुब.)**

समक्ष

**( श्री. आर. एस. जांबोटकर )**
मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद

श्रवणोत्तर स्वीकृती.

**( श्री. आर. एस. जांबोटकर )**
मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद

**दिनांक – ३१/०७/२०२५**

**<u>मध्यान्हाच्या कालावधीनंतर अभियाग पक्षाचा साक्षीदार क्र.१ यांचा पुढील उलटतपास शपथेवर सुरू– आरोपी पक्ष क्र.१ करीता विद्वान श्री. बर्जे पी.एस., विधीज्ञ यांचे द्वारा–</u>**

५४. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र.७४ पत्र दिनांक २२.१२.२०२४ रोजीचे हे एफआयआर दाखल झाल्यानंतरचे पत्र आहे. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र.७४ पत्र हे उपसंचालक क्रिडा व युवक सेवा यांचे नावे काढले होते तर त्यांनीच त्या पत्राचे उत्तर देणे अपेक्षीत होते. हे म्हणणे खरे आहे की, उपसंचालक, क्रिडा व युवक सेवा, श्री. संजय सबनीस यांनी निशाणी क्र.७४ पत्राला आजतागायत उत्तर दिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र.७४ पत्रातील बाबींचे आज पर्यंत श्री. संजय सबनीस यांनी पुर्तता केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, श्री. संजय सबनीस यांनी मला आजपर्यंत कधीही निशाणी क्र.७४ पत्राला उत्तर देण्याचे लिखीत अथवा तोंडी स्वरूपात अधिकारी/ आदेश दिलेले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, मला आदेश नसतांना देखील दिनांक २४.१२.२०२४ रोजीच्या पत्राने निशाणी क्र.७४ ला उत्तर दिले. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी क्र.७५ उत्तर दिनांक २४.१२.२०२४ रोजीचे जे मी दिले त्याची कोणतीही आवक जावक प्रक्रिया कार्यालयाने केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र.७५ वर जावकचा शिक्का मारलेला नाही. जावक नोंदवही मध्ये निशाणी क्र.७५ ची नोंद कोणी घेतली, हे मला काय आठवत नाही. मी निशाणी क्र.७५ उत्तराची आमच्या जावक नोंदवहीत नोंद आहे ही नोंद मी स्वतः पाहिली आहे. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी क्र.७५ उत्तराची कोणतीही जावक नोंद नाही व ही जावकची नोंद असल्याचे मी खोटे सांगत आहे. निशाणी क्र.७५ उत्तर हे मी स्वतः बनविले ना की मला कोणी सांगीतले. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र.७४ मध्ये तपासीक अधिकारी यांनी जे काही कागद मागीतले, त्याची वेगळी फेरीस्त या निशाणी क्र.७५ पत्रामध्ये नाही अथवा सोबत जोडली नाही.

**५५.** हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र.७१ च्या जप्ती पंचनाम्यामध्ये क्रमांक ०१ ला असलेल्या कॅश बुकमध्ये जप्तीच्या दिनांकापर्यंत किती रुपयाची एन्ट्री होती हे मला माहीत नाही व हे मला सांगताही येणार नाही. निशाणी क्र.७१ मध्ये नमुद अनुक्रमांक ०१ जप्त कॅशबुक मध्ये ज्या काही नोंदी वेळोवेळी घेण्यात आल्या त्या नोंदी मी पाहिलेल्या आहेत ह्या नोंदी घेतांना नोंदी करणा–याने वेळोवेळी सह्या केलेल्या आहेत. साक्षीदार पुन्हा सांगतो की, नाही. हे म्हणणे खरे आहे की, या सर्व नोंदी या उपसंचालक वेळोवेळी तपासतात व तपासल्यानंतर त्या खाली सही करून त्याखाली तारीख टाकतात. हे म्हणणे खरे नाही की, उपसंचालक या नोंदी तपासल्यावर जी सही करतात त्या सही खाली तारीख टाकतात. हे मला माहीत नाही की, या नोंदी तपासल्यावर त्या किती तारखेला तपासल्या हे समजावे व त्या बद्दल वरिष्ठांना अहवाल

पाठवायचा असतो म्हणून त्या नोंदी तपासल्यावर केलेल्या सहीखाली तारीख टाकणे हा नियम आहे. आमच्या कार्यालयात कॅशबुकमध्ये करण्यात आलेल्या नोंदी एका विशीष्ठ तारखेला तपासल्या हे समजण्यासाठी काही वेगळा पर्याय नाही. हे म्हणणे खरे आहे की, उपसंचालकानी ज्या नोंदी तपासल्या त्या एकाच दिवशी तपासल्या का वेगवेगळ्या दिवशी तपासल्या हे समजायचा काहीही एक मार्ग नाही.

**५६.** हे मला सांगता येणार नाही की, निशाणी क्र.७२ जावक नोंदवही व त्यातील जावक नोंद निशाणी क्र.७३ या नोंदी श्री. संजय सबनीस यांनी तपासल्यात नाही. हे वेळोवेळी तपासण्याचे काम उपसंचालक यांचेच आहे. मला या दोन्ही नोंदी बघायचा योग आला यावर उपसंचालकांच्या ह्या नाहीत.

प्रश्न– निशाणी क्र.७२ व ७३ या नोंदी मागे का ठेवल्या व हजर का केल्या नाही महत्वाचा पुरावा असतांना सुध्दा?

उत्तर–मी आणलेल्या आहेत.

**<u>मा. न्यायालयाची वेळ संपल्यामुळे उर्वरीत उलटतपास पुढील तारखे पर्यंत तहकुब.</u>**

| | |
|---|---|
| <u>समक्ष</u> | <u>श्रवणोत्तर स्वीकृती.</u> |
| **–/स्वाक्षरीत/–** | **–/स्वाक्षरीत/–** |
| ( श्री. आर. एस. जांबोटकर ) | ( श्री. आर. एस. जांबोटकर ) |
| मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद | मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद |
| दिनांक– ३१/०७/२०२५ | |